Internal circulation 1st Feb 1990

-आपला स्नेहांकित,
आत्माराम इंदूरकर, नेर
तहसिल संघटक, मजूर संघटना.

एका ग्रामीण दलीत कार्यकर्त्याची कैफियत

- मु.पो. खरड
गांव, ता. नेर
जि. यवतमाळ

अमरावतीचा जनक कडू याचा दारु प्यालेल्या गुंडांसह मजूर संघटनेचा कार्यकर्ता आत्माराम इंदूरकर व मजूर संघटनेचे सरचिटणीस भाई रजनीकान्त यांचेवर अमरावती येथे हल्ला.

दिनांक २३ जानेवारी-९० सायंकाळी वेगवेगळे बनाव करुन मला अमरावतीला मोटर-सायकलने जनक कडूचे माणसांनी राजकमल चौकातील पुर्णीमा हॉटेलचे वर नेऊन तेथे दारु प्यालेल्या जनक कडू, रमेश रडके व इतर ८/१० गुंडांनी जातीवाचक शिव्या देऊन "आता तुला दाखवतो खरा जनक" असे म्हणून माझ्या पोटात लाथ मारली व इतर गुंडांनी मला बेदम मारहाण केली. संघटनेची कागदपत्रे, कपडे व पैसे असलेली बॅग हिसकावून पळविली. चाकुचा धाक दाखवून मला बळजबरीने महानगर पालिकेच्या जीप-मध्ये बसवून स्वत:च्या घरी नेले व तेथे पुन्हा बेदम मारहाण केली. तसेच चाकू दाखवून जिवे मारण्याची धमकी देवून, भाई रजनीकान्त यांना बैठकीला येण्याची चिठ्ठी लिहून घेतली. तसेच एक पत्रही लिहून घेतले. ही घटना सायंकाळी ७-३० वाजता घडली.

पुणे येथील ग्रामायन संस्थेच्या सीमा खोत, हया पारधीनगर, बडाळी कॅम्प, अमरावती येथे मिस्टर जर्बेटा व अन्य माझ्या कार्यकर्त्यां कडे बैठकीस आल्या असता तेथे भाई रजनीकान्त दि.२३ ला ~~गेले~~ भेटीला असता, त्याठिकाणी गुंडांना पाठवून त्यांना आणायला गेले व जनक कडू याने ८/१० दारु प्यालेल्या गुंडांसह भाई रजनीकान्त यांना मारहाण केली. आम्हा दोघांनाही रात्रभर स्वत:च्या घरात कोंडून ठेवले. भाई रजनीकान्त हे तर जबर मारामुळे वेदनाग्रस्त रात्रभर तडफडत पडून होते. आम्हा दोघांनाही "पुन्हा अमरावतीमध्ये आलेत व माझ्याविरुध्द बोललेत तर तुकडे करुन जिवे मारेन, ही फक्त सलामी दिली" एवढी जबर धमकी जनक कडू व सोबतच्या गुंडांनी दिली. मला दि. २४ ला काही दोन गुंडांचेसह बस स्टॅंडवर पोहचवून देण्यात आले व गावाला पाठविण्यात आले. मला तोंडावर व एवढा पोटात जबर मार दिला होता की, दुसरे दिवशी रक्ताची उलटी झाली. मला एवढी दहशत बसली होती की, मी २ दिवस घरात झोपून होतो. २ दिवसांनी भाई रजनीकान्त यांनी स्वत: येऊन मला दिलासा दिला. सदर घटनेचा रिपोर्ट राजापेठ पोलीस स्टेशन, अमरावतीला नोंदविण्यात आला आहे.

सराईत गुन्हेगारालाही लाजवेल असा हा गुंड प्रवृत्तीचा अमरावती हमाल कामगार संघटनेचा अध्यक्ष व महाराष्ट्र हमाल, मापाडी महामंडळाचा सहसचिव जनक कडू यांची पूर्ण बुरखेफाड करुन त्याच्या गुंड व झुंडशाहीचे आव्हान मी स्विकारीत आहे.

वरील घटनेच्या वेळी जनक कडू सोबत- दिलीप अग्रवाल, बबन रडके, रमेश चौधरी, उषा कडू खुले, पुण्याचे समता शिबीरात आलेले २ युवक व इतर ७/८ दारु प्यालेली माणसे सावेळी होती.

. . . . . . . . . .

भारतातील सर्वात जास्त मजुरांची संख्या असलेल्या यवतमाळ जिल्हयातील नेर तहसिलमधील खरडगांवचा (खडकाळ) मी अल्पसा शिकलेला गरीब, दलीत कार्यकर्ता. ३ वर्षा पासून आदिवासी, दलीत कष्टक-यांच्या न्यायय हक्कासाठी व अन्याय, भ्रष्टाचार-विरोधी मजूर संघटनेचे काम करीत आहे. पोट भरण्यासाठी पत्नी व गरजेनुसार मी मजुरीचे काम करतो. मजुरांना संघटीत करतो. अन्यायाविरोधी उठवितो म्हणून गांव व परिसरातील भ्रष्ट प्रस्थापित जातीयवादी लोकांनी चिडून जाऊन माझे घर २ वेळा कुटूंबीयांसह झोपलो असता जाळण्याचा प्रयत्न केला, शेतातील पिक उध्वस्त केले, मला मारण्याच्या धमक्या दिल्यात, कोर्टात व पोलीस स्टेशनला खोटया तक्रारी दाखल करुन मला सळो की पळो करण्याचा प्रयत्न चालविला. अशा भयानक दहशतवादी स्थितीत मी प्रस्थापितांचे विरोधी लढत आहे.

कृमाप....२

जनक कडूचे मी कोणतेही नुकसान केले नाही. २ वर्षापूर्वी गावात भव्य सत्कार केला. अमरावतीस हमाल कामगारांचा संप सुरु असतांना (माझे संघटनेची ऐपत नसतांना-ही) लढ्याला आर्थिक मदत केली. असे असतांना गेली ७/८ महिन्यापासून गावातील, परिसरातील जातीयवादी, भ्रष्ट लोकांना भडकवून संघटनाविरोधी विविध अफवा पसरवून चळवळ व संघटना फोडण्याचा प्रयत्न केला. माझ्या गावात रो.ह.यो.कामावर झालेल्या अन्यायाविरुध्द दाद मागण्यासाठी मा २ ऑक्टो.पासून काढलेल्या ८०० कि.मी.ची महिला मजूर जनजागरणा दिंडी(पदयात्रा), भ्रष्ट लोकांना गावात पाठवून फोडण्याचा, बदनाम करण्याचा व विविध प्रकारे अडथळे आणण्याचा कडू नी आटोकाट प्रयत्न केला. तत्पूर्वी ही दिंडीकाढू नकोस, भ्रष्ट कमचा-यांचा पिच्छा सोडून दे. तुझे मी भले करुन देतो, तू संघटना सोडून दे" म्हणून सांगितले. मला आमिष दाखविण्यात आले, मी नकार दिला तेंव्हा मला पदयात्रा तडीस जाणार नाही, अशी गर्भित धमकी दिली. यापूर्वीही १/२ वेळा कडू यांचेकडे एका भ्रष्टाचार प्रकरणी मार्गदर्शन घेण्यासाठी गेलो असता माझे समोरच त्यांनी संबंधीत अधिका-यास फोन केला व आरणास चांगले घबाड मिळाल्याचे सांगितले व नंतर अधिका-यांशी परस्पर संगनमत केले.

पोट भरण्यासाठी भ्रष्ट प्रस्थापित अधिका-यांशी संगनमत करणा-या जनक कडूने दि.२१ जानेवारीस माझेवर व भाई रजनीकान्त यांचेवर केलेला भ्याड हल्ला व जिवे मारण्याची दिलेली धमकी, हे एक आव्हानच आहे.

माझ्या या अनुभवाद्वारे, पुरोगामीपणाचा आव आणून सभ्य व प्रतिष्ठीतपणाचा बुरखा पांघरलेला, पोट भरण्यासाठी भ्रष्ट अधिका-यांकडून हप्ते घेणारा व गुंड व गुंडशाहीद्वारे आपली ही काळी कृत्ये झाकण्याचा प्रयत्न करु पाहणारा, विकृत प्रवृत्तीचे, स्त्री-लंपट जनक कडूचे खरे कडू(कुरुप) रुप मी आपल्या सर्वांचे समोर उघड करण्याचे आव्हान स्विकारले आहे.

हा चारित्र्यहीन माणूस शिबीरे, मेळावे आदि तसेच मित्रांचे माध्यमातून मुली व स्त्रियांशी परिचय करुन घेऊन, त्यांचे पत्ते घेऊन त्यांना असभ्य पत्रे पाठवून गैर-फायदा घेण्याचा प्रयत्न करतो. परिचयाचे माध्यमातून परस्पर हितसंबंध साधतो. २ वर्षापूर्वी मजूर संघटना संलग्न असणा-या मुंबईच्या आय.एफ.डी.डब्ल्यु.डब्ल्यु. या महासंघाचे ऑफिसमधून मजूर संघटनेची जवळीक सांगून व भाई रजनीकान्त यांचा परिचय देऊन २ हजार रुपयांची पुस्तके अर्ध्या तासाने पैसे आणतो म्हणून सांगितले. परंतु, अद्याप पैसे दिले नाहीत. मुंबईच्या सामाजिक कार्यकर्त्या ॲड. गायत्रीसिंग यांना बतावणी करुन परस्पर नागपूरला अनोळखी ठिकाणी बोलाविले. कागदोपत्री विविध संस्था व अनेक संघटना हया आपल्या अधिपत्याखाली दाखवून राजकीय पुढारी, मंत्री व अधिका--यांवर दबाव व प्रभाव जमविण्याचा खटाटोप करीत असतो.

रोजगार हमी बदलासाठी भाई रजनीकान्त यांना मुख्यमंत्र्याने मागीतलेल्या सूचना व प्रस्ताव, भूमिसेवेचे श्री.नागेश हाटकर व भाई रजनीकान्त यांनी मजूर संघटनेचे वतीने तयार केलेले पत्र आपल्याच नांवाने दाखवून मुख्यमंत्र्याकडे पाठविले. हरसूद मेळा-व्यास पाठींबा म्हणून मजूर संघटनेचे लोक जावू नयेत म्हणून माझ्यावर दबाव आणा-ण्याचा प्रयत्न केला. असे हे पराक्रमी पुरुष!

ज्योतिबा फुले, व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचारांची दलीत, पिडीत, श्रमीकांची चळवळ तोडणारा हा भोंदू व भ्रष्ट जनक कडू म्हणजे "वरुन किर्तन-आतून तमाशा". त्याचे पितळ उघडे करण्यासाठी हे पत्रक मी पाठवित आहे. अशा चारित्र्यहीन माणसाला आज महाराष्ट्रात पुरोगामी चळवळीचे व्यासपिठावर प्रतिष्ठा दिल्या जाते, यापेक्षा अशा चळवळीचे दुर्दैव ते कोणते असू शकेल ?

जनक कडू व इतरांविरुध्द कथीत हल्लाप्रकरणी राजापेठ पोलीस स्टेशन, अमरावती येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे. मी मजूरांचे न्याय्य हक्कासाठी केलेल्या आंदोलन प्रकरणी आयुक्त, अमरावती, यांचे मजुरांना न्याय व संबंधीत कर्मचा-यांवर कार्यवाही करीत असल्याचे पत्र आले आहे. याप्रकरणी खासदार श्री.सुदाम देशमुख हे खडगावला येऊन त्यांनी विधानसभेत आवाज उठविला होता. हा दलीत-पिडीत कष्टक-यांचा लढा, मी आपले सर्वांचे प्रेम व सहकार्याने गुंडशाहीला बळी न पडता हा लढा पुढे नेईलच. क्रांती जिंदाबाद!

दि.१/२/९० मजूर संघटना जिंदाबाद! आपला- आत्माराम इंदूरकर.

आत्माराम इंदूरकर

कार्यवाही होण्यासाठी डी.एस.पी. अमरावती ग्रा. जिल्हा. व गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई